## उत्तरपत्रिका

### विभाग – १ : गद्य

**पठित गद्य**

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) नेहमी तिरके बोलणारे**

**उत्तर:** जनोबा रेगे

**(ii) बटाटा सोडण्याचा सल्ला देणारे**


**उत्तर:** सोकाजी त्रिलोकेकर

*      (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)

**(२)   कृती पूर्ण करा.**

**(आकृती कृतिपत्रिकेत पाहा.)**     **[०२]**

**उत्तर:**




**(३)   स्वमत –**     **[०३]**

**पंतांना उपासाबाबत मिळालेल्या विविध सल्ल्यांचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** पंतांना वजन कमी करण्यासाठी अनेकांनी सल्ले दिले. 'डाएट' कर, बटाटा खाणे सोडून दे, याव्यतीरिक्त ज्या लोकांनी पंतांच्या उपवासाची अवहेलना केली होती त्यांनीही त्यांना वजन कमी करण्याचा सल्ला दिला. ते राहत असलेल्या चाळीचे नाव बटाटा चाळ असल्याने त्याचाही उल्लेख करू नये, असे विनोदाने सांगू लागले. एकंदरीत काय? तर, वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत असलेले तज्ज्ञ रोज डझनवारीने पंतांना भेटू लागले व आपआपल्या परीने उपासाबाबत विविध सल्ले देऊ लागले.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१)   का ते लिहा.**     **[०२]**

**(i)   डॉ. माशेलकर यांना माशेल हे गाव सोडावे लागले, कारण...**

**उत्तर:** वडील वारले त्यामुळे उदरनिर्वाहासाठी डॉ. माशेलकर यांना माशेल हे गाव सोडावे लागले.

**(ii)   'शाळेत कसा जाऊ?' असा प्रश्न डॉ. माशेलकर यांच्यापुढे उभा राहिला, कारण...**

**उत्तर:** कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ' असा प्रश्न डॉ. माशेलकर यांच्यापुढे उभा राहिला.

*      (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)

**(२) आकृती पूर्ण करा.** **[०२]**

*** (आकृती कृतिपत्रिकेत पाहा.)**

**डॉ. माशेलकर यांच्या माशेल गावातील आठवणी**

- मैदानावर खेळले
- पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवला

**(३) स्वमत –** **[०३]**

**शालेय विद्यार्थ्यांच्या भूमिकेतील डॉ. माशेलकर यांचे तुम्हाला जाणवलेले गुणविशेष सोदाहरण लिहा.**

**उत्तर:** डॉ. माशेलकर हे अत्यंत कष्टाळू, मेहनती होते. आर्थिक परिस्थिती चांगली नसतानाही न डगमगता जिद्दीने त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. थोरामोठ्यांचा सन्मान करणे व उपकाराची जाणीव ठेवणे हे गुण त्यांच्यात प्रकर्षाने जाणवतात. यामुळे आपली आई, वडील, मामा यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात. ज्या शिक्षकांनी त्यांना घडवले व शिक्षणापेक्षाही बरेच काही दिले याची जाणीव त्यांच्या मनातून व्यक्त होताना दिसते. आपल्या गरिबीचा व महापालिकेच्या शाळेचा त्यांनी कधीही द्वेष केला नाही, उलट त्यावर मात करून शिक्षण घेणारा कुठेही शिक्षण घेऊ शकतो हे सिद्ध करून दाखवले.

डॉ. मालशेकर यांचा प्रामाणिकपणा, जिद्द, संयम, आत्मविश्वास, आदर, स्वाभिमान व अभ्यासाची तळमळ या गुणांचे पदोपदी दर्शन आपल्याला पाठात दिसते.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) योग्य जोड्या लावा.** **[०२]**

**उत्तर:**

| अ. क्र | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १. | सूर्य | प्रकाश |
| २. | मेघ | पाणी |
| ३. | शेतकरी | धान्य |
| ४. | विणकर | वस्त्र |

*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) एका शब्दात उत्तरे लिहा.** **[०२]**

**(i) आपल्या विकासासाठी आवश्यक असलेला**

**उत्तर:** संयम

**(ii) आपले पोषण करणारी**

**उत्तर:** सृष्टी

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.** **[०२]**

(i) मुळावर घाव घातले; तरी मुकाट सहन करणारे – झाड

(ii) अलगद उतरणारे थेंब – दवाचे थेंब / दव

**✻ (कविता कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) आकृती पूर्ण करा.**

**✻ (आकृती कृतिपत्रिकेत पाहा.)** **[०२]**

**उत्तर:**

**झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी**

- शरीरभर हिरवा रंग विरघळतो.
- रक्त हिरवेगार होते, आयुष्य टवटवीत होते.

**(३) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा.** [०२]

**उत्तर:** (i) मुकाट – शांत / चूपचाप / निमूट /गप्प

(ii) संथ – सावकाश / मंद / हळू

(iii) मुसाफिर – प्रवासी / यात्रेकरू

(iv) मौन व्रत – न बोलण्याचा नियम / अबोला

**(४) काव्यसौंदर्य**

**'जगावं कसं तर? हिरव्या झाडासारखं' या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा. [०२]**

**उत्तर:** 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेत कवी जॉर्ज लोपीस यांनी झाडाच्या रूपातून माणसाला जीवन कसे जगावे याचा संदेश दिला आहे. झाड जगत असताना ऊन, पाऊस, वारा, वादळ यांच्याशी झुंज देत खंबीरपणे उभे असते. याप्रमाणे माणसांनी जीवनात निर्धाराने उभे राहावे. झाडासारखी परोपकारी वृत्ती, सहनशीलता, दातृत्व या गुणांची महती समजून घेऊन ते गुण अंगी बाणवावेत, असा मोलाचा संदेश दिला आहे.

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा. [०८]**

**'अंकिला मी दास तुझा' किंवा 'स्वप्न करू साकार'**

**'अंकिला मी दास तुझा'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी [०१]**

**उत्तर:** संत नामदेव

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय [०१]**

**उत्तर:** परमेश्वर कृपेची याचना, भक्ती

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा. [०२]**

'अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ।।'

**उत्तर:** 'अंकिला मी दास तुझा' या अभंगात संत नामदेवांनी विविध दृष्टान्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे. संत नामदेवांनी विठ्ठलाला माऊली म्हणजे आई म्हटले आहे. आई ज्याप्रमाणे आपल्या मुलाची काळजी घेते त्याप्रमाणे विठ्ठल आपल्या भक्तांची काळजी घेतो. हे सांगताना संत नामदेव यांनी पक्षीण, गाय-वासरू, हरीण-पाडस व चातक पक्ष्यांची समर्पक उदाहणे देऊन परमेश्वराचे अस्तित्व स्पष्ट केले आहे. अग्नीमध्ये बाळ पडत असताना माता आपल्या जिवाची पर्वा न करता धावून जाते व बाळाचे रक्षण करते.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण [०२]**

**उत्तर:** हा अभंग आवडण्याचे कारण म्हणजे विविध दृष्टान्तांतून संत नामदेवांनी भक्ती मार्गाचा संदेश दिला आहे. समर्पक उदाहरणे व ओघवती, लयबद्ध भाषा वापरली

आहे. विठ्ठलाचे भक्ताशी असलेले नाते सहज सुंदररित्या स्पष्ट होते. यामुळेच भावना हृदयाला स्पर्श करतात व अभंग मनाला भिडतो.

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

(१) काज – काम

(२) सवें– लगेच

(३) पाडस – हरिणीचे पिल्लू

(४) धेनू – गाय

**'स्वप्न करू साकार'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी** **[०१]**

**उत्तर:** किशोर पाठक

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय** **[०१]**

**उत्तर:** देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** **[०२]**

'हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट.'

**उत्तर:** 'स्वप्न करू साकार' या कवितेत कवी किशोर पाठक यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकजुटीचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व सांगताना ते म्हणतात, 'श्रमकरी, कष्टकरी लोकांच्या हजारो हातांनी आपण आपला देश बळकट करू.' आम्ही भारतीय हजारो–लाखोंच्या संख्येने असलो तरी आमची एकजूट मजबूत आहे. सर्वांची ताकद एकाच मनगटात आहे.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण** **[०२]**

**उत्तर:** प्रस्तुत कविता आवडण्याचे कारण म्हणजे कवीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. तसेच नैतिक मूल्ये जोपासून देशप्रेमही व्यक्त केले आहे. श्रमप्रतिष्ठा व एकता यांचे दर्शनही या कवितेत दिसून येते.

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

(१) विभव – वैभव / संपत्ती

(२) मंगल – पवित्र / शुभ

(३) श्रम –कष्ट / मेहनत

(४) हस्त – हात / कर

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[०६]**

**(१) टीप लिहा.**

**व्युत्पत्तीकोशाचे कार्य.**

**उत्तर:** एखाद्या शब्दाबद्दलचे कुतूहल व त्याच्या निर्मितीच्या अर्थाचे मूळ ज्ञान पाहण्यासाठी आपण व्युत्पत्तीकोशाची मदत घेतो.

व्युत्पत्तीकोशामध्ये मूळ शब्द केव्हा, कुठे, कसा निर्माण झाला ते समजते.
व्युत्पत्तीकोशामध्ये मूळ ज्ञान पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते.

(१) शब्दाचे मूळ शब्दरूप दाखवणे, प्रमाण भाषा व बोली भाषा-रूप व अर्थ.

(२) भाषेतील उच्चारातील बदल व फरक दाखवणे.

(३) शब्दांचे अर्थ भिन्न काळांत व इतिहासाच्या दृष्टीने बदलतात. या बदलांचा फरक स्पष्ट करणे.

(४) शब्दांचे अर्थ भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळ्या कारणांनी अर्थाच्या अनुषंगाने बदलतात, ते बदल स्पष्ट करणे.

**(२) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते हे 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाच्या आधारे लिहा.**

**उत्तर:** भाभा अणुसंशोधन केंद्रात संशोधनाचे फार मोठे कार्य चालते. लेखक तेथे ट्रेनिंग स्कूलला गेले होते. एकदा लेखकांनी डॉ. भाभा यांना विचारले होते, आम्ही जवळ जवळ १०० मुले-मुली आहोत; पण सर्वांना पुरेल एवढे काम कुठे आहे इथे? ते म्हणाले, ''तुम्ही स्वत:च काम निर्माण करा. आपल्याला काम नाही, हा विचार मनातून काढून टाका. सांगितले तेवढेच काम करायचे ही प्रवृत्ती काढून टाकली पाहिजे.''

स्वानुभवाने ते म्हणाले, आपणच आपले काम निर्माण केले की 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**(३) कवीने 'जाता अस्ताला' या कवितेत 'पणती'च्या प्रतीकातून काय सांगितले आहे, हे तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** 'जाता अस्ताला' या कवितेत कवी रवींद्रनाथ टागोर यांनी सूर्य आणि पणतीच्या प्रतीकांद्वारे अगदी छोट्या जीवातही जगाला काही तरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते हे सांगितले आहे.

सूर्याच्या अस्तानंतर पृथ्वी अंधकारमय होईल याची चिंता सूर्याला होती. या

वेळी एक छोटीशी पणती मोठ्या हिमतीने, धैर्याने प्रकाश देण्याचे काम आपल्या परीने पूर्ण करते. दुसऱ्याला मदत करण्याची परोपकारी वृत्ती पणतीत दिसून येते. प्रामाणिकपणा व दृढ इच्छाशक्ती या जोरावर अंधकार दूर करण्याची व पृथ्वीवर प्रकाश देण्याची ताकद व यातून जग सुंदर करण्याची भावना पणतीच्या प्रतीकातून स्पष्ट होते.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

**(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** [०२]

**(i) तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का?**

**उत्तर:** प्रश्नार्थी वाक्य

**(ii) रनिंगपेक्षादेखील दोरीवरच्या उड्या मारा.**

**उत्तर:** आज्ञार्थी वाक्य

**(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** [०२]

**(i) नेहमी खरे बोलावे. (नकारार्थी करा.)**

**उत्तर:** खोटे कधी बोलू नये.

**(ii) तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा. (विधानार्थी करा.)**

**उत्तर:** तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करावी.

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. (कोणतेही दोन)** [०४]

**(i) उत्साहाला उधाण येणे – खूप आनंद होणे.**

**उत्तर:** दिवाळीच्या सणाला गावाहून आजी घरी आल्याने सर्वांच्याच उत्साहाला उधाण आले होते.

**(ii) गलका करणे – गोंधळ करणे.**

**उत्तर:** वर्गात शिक्षक नसल्याने सर्व मुलांनी एकच गलका केला होता.

**(iii) झोकून देणे – पूर्णपणे सहभागी होणे.**

**उत्तर:** महात्मा गाधीजींनी आपले संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी झोकून दिले होते.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती**

**(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (अ) पाऊस = पर्जन्य / वर्षा (ब) मधुर = गोड

**(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (अ) सुरुवात x अंत / शेवट (ब) स्तुती x निंदा

**(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (अ) पायात चप्पल न घालता – अनवाणी

**(iv) वचन बदला.** **[०१]**

**उत्तर:** (अ) गोष्ट – गोष्टी (ब) कल्पना – कल्पना

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **[०२]**

**(अ) कवीवर्य नारायण सुर्वे खुप सभा, संमेलने गाजवत.**

**उत्तर:** कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत.

**(ब) तीने माझ्यासाठी प्रंचड कष्ट केले.**

**उत्तर:** तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले.

**(३) विरामचिन्हे**

**खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा.** **[०२]**

**(अ) अरे पण चिठ्ठी मराठीतून आहे.**

**उत्तर:** ''अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे.''

**(ब) ''काका हे शास्त्रीय सत्य आहे''**

**उत्तर:** ''काका, हे शास्त्रीय सत्य आहे.''

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.** **[०६]**

* **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

दिनांक: ०४ जुलै २०२०

प्रति,

सुहास देसाई

साई सदन २, गोखले रोड,

दादर, मुंबई – ४०००१४.

प्रिय सुहास,

सप्रेम नमस्कार.

जीवनज्योती विद्यालय, नांदगाव येथील शाळेने राज्यस्तरीय ‘कथाकथन’ स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धेत माध्यमिक विभागातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आपणास प्राप्त झाले आहे.

आपल्या या यशाबद्दल आयोजकांतर्फे हार्दिक अभिनंदन. यशस्वी व पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ कार्यक्रम २२ जुलै २०२० रोजी शाळेच्या सभागृहात दुपारी ४.०० वाजता आयोजित केला आहे.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा. श्री. अजय लागू व प्रसिद्ध लेखक मा. श्री. उत्तम कांबळे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. आपण या पारितोषिक विरतण समारंभास आपल्या पालकांसह उपस्थित राहावे, ही नम्र विनंती. पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन!

आपले स्नेहांकित

दीपक माने (विद्यार्थी प्रतिनिधी)

जीवनज्योती विद्यालय

नांदगाव – ४८९५३२

संपर्क: ई–मेल आयडी – jj22@gmail.com

**(किंवा)**

**उत्तर:**

दिनांक: ०४ जुलै २०२०

प्रति,

माननीय श्री. उत्तम कांबळे,

एच.एम.बी. पब्लिक स्कूल,

अंधेरी (प),

मुंबई– ४०० ०५८.

**विषय:** पारितोषिक वितरण समारंभास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याबाबत विनंती पत्र.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

जीवनज्योती विद्यालय, नांदगाव येथील शाळेत राज्यस्तरीय 'कथाकथन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ७० शाळांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. प्राथमिक व माध्यमिक विभागातून प्रत्येकी तीन-तीन विद्यार्थी व उत्तेजनार्थ दोन विद्यार्थी यांना विद्यालयाने पारितोषिके जाहीर केली आहेत.

२२ जुलै २०२० रोजी शाळेच्या सभागृहात दुपारी ४.०० वाजता पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. अजय लागू उपस्थित राहणार आहेत व या कार्यक्रमास आपण अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व आम्हास मार्गदर्शन करावे, अशी सर्वांचीच इच्छा आहे.

आपण आमच्या विनंतीस मान देऊन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून उपस्थित रहावे, ही विनंती. आपणास सन्मानपूर्वक कार्यक्रमस्थळी ने-आण करण्याची व्यवस्था आयोजकांनी केली आहे.

आपला शुभचिंतक<br>
दीपक माने (विद्यार्थी प्रतिनिधी)<br>
जीवनज्योती विद्यालय,<br>
नांदगाव - ४८९५३२<br>
संपर्क: ई-मेल आयडी - jj22@gmail.com

**(किंवा)**

**(२) सारांश लेखन.** **[०६]**

**✲ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** आपल्या व समाजाच्या विकासासाठी, हितासाठी संयम आवश्यक आहे. आपले जीवन हे समाजासाठी आहे. सूर्य, मेघ, वृक्ष, फूल, फळे, शेतकरी, सर्व सजीव-निर्जीव सृष्टी यांचे आभार माना व आपले जीवन अर्पण करा.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[१०]**

**(१) जाहिरातलेखन (५० ते ६० शब्द)** **[०५]**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**०५ मे ते २६ मे २०२०**

***उन्हाळ्याची सुट्टी***

आनंदाची बातमी

*** मित्रा चित्रकलेची जत्रा ***

**शाळेतर्फे चित्रकलेचे साहित्य मोफत.**

**रोज संध्याकाळी ४.०० ते ६.००**

चित्रकला वर्गाचे आयोजन. रंग, ब्रश, पेपर, कॅनव्हास, क्रेयॉन कलर सर्व काही मोफत

मर्यादित प्रवेश.
माफक फी.

प्रशिक्षित उच्च दर्जाचे शिक्षण
देणारे अनुभवी शिक्षक.
ए.सी. वर्ग. वर्गातील प्रथम पाच
विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिक

एका वर्गात फक्त
२५ विद्यार्थी.

**त्वरा करा ! त्वरा करा ! त्वरा करा.**

**स्थळ :** ज्ञानगंगा विद्यालय, ठाणे

**संपर्क :** ९८९२७५५३१५

**(२) बातमीलेखन** **[०५]**

**क्रीडा महोत्सव संपन्न**

**उत्तर:**

*** क्रीडा महोत्सव संपन्न ***

आमच्या वार्ताहराकडून, दि. १४ जानेवारी

माणसाच्या बौद्धिक, मानसिक व शारीरिक विकासासाठी खेळांची आवश्यकता असते, असे प्रतिपादन मा. श्री. रोहित बर्वे यांनी केले. साने गुरुजी विद्यालय, सोलापूर येथे १३ जानेवारी रोजी शाळेच्या भव्य पटांगणात सकाळी आठ वाजता मोठ्या उत्साहाने वार्षिक क्रीडा महोत्सव पार पडला.

साने गुरुजी विद्यालयाच्या या वार्षिक क्रीडा महोत्सवात विविध कवायतींचे प्रकार, मल्लखांब, लेझीम व क्रीडा साहित्यावर आधारित नृत्य प्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले.

या क्रीडा महोत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संचालिका माननीय सौ. अपर्णा भोसले व अध्यक्ष माननीय श्री. रोहित बर्वे उपस्थित होते. या प्रसंगी विविध क्रीडा स्पर्धांत विजयी स्पर्धकांस रोख रक्कम व स्मृती चषक देण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. जितेंद्र महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच अध्यक्षांनी पाहुण्यांचे आभार मानले. या प्रसंगी शाळेचे विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**(३) कथालेखन** **[०५]**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**खरा मित्र**

**उत्तर:** मुंबईतील शहाजी राजे क्रीडा संकुलात आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईचे महापौर प्रकाश पंचाल कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. क्रीडा स्पर्धेचा शेवटचा प्रकार म्हणजे धावण्याची स्पर्धा होती.

धावण्याच्या स्पर्धेला सुरुवात होणार होती. राजहंस विद्यालयाचा वरदही या स्पर्धेत सहभागी झाला होता. अनेक शाळेचे धावपटू एका रांगेत धावण्याच्या तयारीत होते. वरदने अनेकदा अशा स्पर्धेत यश प्राप्त केले होते. या वेळी त्याची शर्यत होती ती त्याचाच मित्र तनयशी. स्पर्धा फारच चुरशीची होणार यात तिळमात्र शंका नव्हती. मैदानातील प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहचली होती.

महापौरांनी स्पर्धेला हिरवा कंदील देताच सर्व स्पर्धक जोराने धावू लागले. मैदानात एकच जल्लोष सुरू झाला.

स्पर्धक कधी मागे तर कधी पुढे होत होते. मात्र दोन स्पर्धक म्हणजे वरद आणि बरेच आघाडीवर होते. वरद आणि तनय यापैकी एक प्रथम क्रमांक प्राप्त करणार याबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती, पण धावता धावता अचानक तनयचा पाय मुरगळला व तो खाली कोसळला. हे लक्षात येताच वरद आपला ट्रॅक सोडून तनयकडे आला. त्याचा पाय आपल्या हातात घेतला व तो मसाज करू लागला. आपला क्रमांक सोडून तो मागे आला होता. त्याच वेळी इतर स्पर्धक धावत पुढे गेले. तनय व वरद दोघेही स्पर्धक मागे राहिले; पण मैत्रीच्या दुनियेत मात्र त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. स्पर्धा हरूनही महापौरांनी वरदचे कौतुक केले व त्याचा विशेष सन्मान केला. खरच, जीवनाच्या स्पर्धेत पुढे जायचे असेल तर मैत्रीची साथ हवीच हे वरदने कृतीतून दाखवून दिले.

**तात्पर्य:** संकटकाळी जो मदत करतो तोच खरा मित्र.

**प्रश्न ५. (इ) लेखनकौशल्य (१०० ते १२० शब्द)** **[०८]**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

**(१) प्रसंगलेखन**

**पावसाळ्यातील एक दिवस**

*** (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** आभाळ भरून आले होते. संध्याकाळची वेळ, पक्षी आपल्या घरट्याकडे परतत होते. पूर्ण अंधारही नाही व प्रकाशही नाही. थंडगार वारा व पानांची सळसळ अशा प्रसन्न व आल्हाददायक वातावरणात आम्ही उभे होतो लोणावळ्याच्या एका टेकाडीवर.

अनेक पर्यटक पावसाळ्यातील मजा घेण्यासाठी लोणावळ्यात आले होते. रस्त्यावरील मक्याची गरमा-गरम कणसे व वडापाव खात आम्ही लोणावळ्यातील सुंदर निसर्गाचा आस्वाद घेत होतो व इतक्यात पावसाची संततधार सुरू झाली.

पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या व आम्ही मनसोक्त भिजत होतो. हळूहळू पावसाचा जोर वाढत होता. डोंगरावरून पाऊस खाली कोसळत होता. जणू काही सगळीकडे छोटे छोटे धबधबे तयार झाले होते. पाणी फेसाळत, घोंगावत खाली येत होते. संपूर्ण परिसर जलमय झाला होता. हिरवीगार सृष्टी पावसात न्हाऊन निघाली होती. नदी, नाले व रस्त्यावरील खाचखळगे पाण्याने भरून गेले होते. रस्त्यावरील वाहतूक पाण्याच्या प्रवाहाने मंदावली होती. पर्यटकांनी आपल्या वाहनातून खाली उतरून रस्त्यावरील कडेला उपलब्ध असलेल्या चायनीज स्टॉलवर व चहाच्या टपरीवर गर्दी केली होती. आम्हीसुद्धा एका चहाच्या टपरीवर सहकुटुंब गेलो.

आकाशात विजा चमकू लागल्या. ढगांचा गडगडाट व मुसळधार पाऊस यांनी मात्र आता रौद्र स्वरूप धारण केले. मंदावलेली वाहतूक आता पूर्णपणे बंद पडली होती. सगळीकडे पाणीच पाणी झाले होते.

चिंब भिजलेल्या शरीराला आता हुडहुडी भरल्याने पाऊस थांबावा, अशी इच्छा मनात निर्माण झाली. थंड शरीराबरोबर पाऊसही हळूहळू थंड झाला व अंधार पडू लागला. पाणी ओसरू लागले, वाहतूक सुरू झाली. यात्रेकरूही आपल्या परतीच्या मार्गाने घरी जाऊ लागले व आम्हीही आमच्या गाडीत बसून मुंबईला प्रयाण केले. लोणावळामधील एक अविस्मरणीय आनंददायी पावसाला स्मृतीत घेतच आम्ही घरी पोहचलो.

## (२) आत्मकथन

✻ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **✻ मी पुस्तक बोलतोय! ✻**

माझा छंद म्हणजे वाचन. नेहमीप्रमाणेच सकाळीच वाचनालयात गेलो. ग्रंथालय प्रमुख आरती मॅडम वाचनालयात नव्हत्या. दरवाजा सताड उघडा होता. मी पुस्तकांच्या जुन्या गठ्ठ्यांकडे गेलो आणि परत मागे वळत होतो इतक्यात कोणी तरी माझा हात खेचला. मागे वळून पाहतो तर काय? एक पुस्तकच माझ्याशी बोलत होते.

''ए बाळा, तू आमच्याकडे बघून लगेच पुढे निघून गेलास. आजची पिढी मला दूर करून मोबाइलच्या दुनियेत व्यस्त आहे. मला माहिती आहे आजचा जमाना डिजिटलचा आहे; पण माझे अस्थित्वही महत्त्वाचे आहे. विविध विषय आम्ही पुस्तकांनी हाताळले आहेत. पुस्तके तुम्हाला ज्ञान देतात. आम्ही तुमचे खरे मित्र आहोत. कधीही, कुठेही तुम्ही पुस्तके वाचू शकता. माझी किंमत कमी असली तरी जीवनातील किंमत अमूल्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे महान नेते 'ग्रंथ हेच गुरू' मानत.''

''माझा वापर करण्यासाठी तुम्हाला ना महागडी उपकरणे लागत ना इंटरनेटचा वापर करावा लागत. वर्तमान, भूत, भविष्य या विषयी पुस्तकांद्वारे जाणून घेता येते.

सर्वांगीण ज्ञानाचा खजिना म्हणजे पुस्तक. याचा वापर जपून करा. सहज कुठेही उपलब्ध होणारे ज्ञानाचे स्वस्त व मस्त साधन म्हणजे पुस्तक. पुस्तके वाचून ज्ञान अधिक प्रगल्भ होते.''

''संगणकाच्या व आधुनिक दुनियेत पुस्तकापासून आजची पिढी दूर जात आहे याची मला खंत आहे. वाचन प्रेरणा दिन, ग्रंथोत्सव, पुस्तक जत्रा यातून मला आज नव्याने महत्त्व प्राप्त होत आहे याचा मला आनंद होत आहे. मानवाने कितीही प्रगती केली तरी पुस्तकांची साथ तो कधीही सोडणार नाही, अशी मी आशा बाळगतो.''

'जुने ते सोने' या उक्तीचा मला प्रत्यय आला आणि मी वाचनालयात बसून खरच पुस्तक वाचू लागलो. म्हणूनच म्हणतात, 'जो पुस्तक वाचेल तोच वाचेल'.

## (३) वैचारिक

✻ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **✻ युग संगणकाचे ✻**

मानवाने विज्ञानाच्या जोरावर सर्व क्षेत्रांत प्रगती केली आहे. शेती, विज्ञान, आरोग्य, तंत्रज्ञान, शिक्षण या सर्वच क्षेत्रांत विकासाचे कारण म्हणजे जगात आणलेली आधुनिक क्रांती 'संगणक'.

संगणक म्हणजे मानवी मेंदूने तयार केलेले विकसनशील यंत्र. संगणक ज्या वेळी आपल्या देशात पादाक्रांत होत होता त्या वेळी त्याला प्रखर विरोध झाला होता. कोणत्याही नवीन प्रणालीला सुरुवातीला विरोध सहन करावाच लागतो. संगणकामुळे बेकारी वाढेल, तरुणांना काम मिळणार नाही, यामुळे देशात बेरोजगारी निर्माण होईल अशी भिती निर्माण झाली होती. परंतु आज संगणक ही काळाची गरज झाली आहे.

आजचे युग संगणकाचे युग आहे. संगणकामुळे कामे अचूक व गतिशील होऊ लागली आहेत. मोठमोठ्या फायली, रेकॉर्ड्स ठेवण्यासाठी जी कसरत करावी लागत होती ती नष्ट झाली. हजारो पानांची माहिती छोट्याशा पेन ड्राइव्हमध्ये समाविष्ट झाली आहे. कागदाचा वापर कमी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास थांबला. आकडेमोड, गुंतागुंतीची समीकरणे भौतिक व जीवशास्त्रीय अचूक माहिती संगणकाद्वारे तात्काळ उपलब्ध होऊ लागली. संगणकामुळे वैद्यकीय क्षेत्रात फारच क्रांती झाली. दुर्धर आजार, शस्त्रक्रिया, औषधोपचार व तपासणी यासाठी संगणकाचा वापर झाल्याने अचूक निदान व योग्य उपचार देणे सहज शक्य झाले. शस्त्र व अस्त्र यांच्या वापराची क्षमता लाखपटीने वाढली. रणांगणावर न जाताच शत्रूचा वेध घेणे संगणकामुळे सहज शक्य झाले. बँक, उद्योग, व्यवसाय, व्यापार, राजकारण, शिक्षण, समाजकारण, इतकेच काय तर गुन्हेगारीला आळा घालणे ही संगणकामुळे सहज शक्य  झाले.

संगणकाच्या अतिवापरामुळे अनेक धोकेही निर्माण झाले आहेत. संगणकतज्ज्ञांचा वापर गुन्हेगारी क्षेत्रात झाला. हॅकिंग प्रकारामुळे बँकेचे व्यवहार संशयास्पद होऊ लागले. लाखो रुपये संगणकाद्वारे चोरीला जाणे सहज शक्य झाले. गोपनीय माहिती चोरीला जाऊ लागली. फायली चोरीला जाऊ लागल्या. डेटा भ्रष्ट होऊ लागला. व्हायरल निर्माण झाले. सायबर क्राइम या नावाने नवीन गुन्हेगारी क्षेत्र निर्माण झाले. यासाठी संगणक वरदान असले तरी मानवाच्या वापरावरच त्याचे भविष्य अवलंबून आहे.

★★★